**प्रेसनोट** **दिनांक ०९/०२/२०२४**

# घरफोडीच्या गुन्हयातील आरोपीस अटक करून मालमत्ता हस्तगत केलेबाबत

फिर्यादी नामे श्रीमती साधना सुनिल निर्मल वय ३५ वर्षे या दिनांक ०४/०२/२०२४ रोजी १६.४५ ते १८.०० वाजताचे दरम्यान फिरण्याकरिता घराबाहेर गेले असता त्यांचे प्यारी नगर, खारदांडा, खार पश्चिम, मुंबई येथील राहते घराच्या दरवाजाचे कुलूप कोणीतरी अज्ञात इसमाने तोडून घरामध्ये प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम अशी एकूण ९,६८,१५०/- रूपयांची चोरी केली आहे, अशी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक ०५/०२/२४ रोजी खार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १०४/२०२४, कलम ४५४, ४५७, ३८० भा.द.वि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या आजपावेतो केलेल्या तपासावरून सदरचा गुन्हा हा आरोपी प्रेम मोहन राठोड वय ३६ वर्षे यांने केला असल्याचे निष्पन झालेने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून त्यांचेकडून गुन्हयात चोरीस गेलेली मालमत्ता १) २५४ वजनाचे सोन्याचे दागिणे २ ) १३२५ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने ३) मनगटी घडयाळ ४) रोख रक्कम रु. ९६,५००/- असे **एकूण रुपये ९,६८,१५०/- ची मालमत्ता हस्तगत** करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे. सदर अटक आरोपी विरुध्द वांद्रे, खार, सांताक्रुझ, विलेपार्ले पोलीस ठाणे येथे जबरी चोरी, घरफोडी , चोरी या कलमान्वये ०५ गुन्हे दाखल आहेत.

खार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उपनि. श्री. प्रदीप पाटील आणि गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार सर्व श्री. भरत काच्चे, दिनेश शिर्के,, योगेश तोरणे, महेश लहामगे, मनोज हांडगे यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

--------oo-------